Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# "वादळ वारा" : एक समीक्षात्मक प्रवास

(कवी- प्रा. आशिष घाटोळे)

**डॉ. विजया जितेंद्र राऊत**
विमेंस कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स
नागपूर
Mob. No. ९८५००५३४१४

---

**सारांश :**

*भारतातील एक ज्वलंत व नवीन समस्या भ्रष्टाचाराची आहे. तसेच भारतातील वाढती लोकसंख्या बऱ्याच समस्येचे मूळ आहे. तरुण पिढी नोकरीशिवाय इतर व्यवसाय करायला तयार नाही. तसेच सर्वात मोठी समस्या म्हणजे जातीयवाद होय. आतंकवाद ही नवीन समस्या आहे . परंतु सत्ताधारी पक्ष याविरुद्ध कोणतेही ठोस पाऊल उचलत नाही . भारतीय न्यायव्यवस्था ही सुद्धा काही प्रमाणात भ्रष्ट झालेली आहे. त्यामुळे आपल्या भारतीय समाजाला प्रगतीच्या दृष्टीने अडथळे निर्माण होत आहे. मानवाच्या वाट्याला निराशाच आलेली दिसते . पण ती निराशा अंगी न बाळगता संकटाला सामोरे जाऊन मार्गस्थ होणे असा संदेश त्या कवितासंग्रहातील कवितांनी दिलेला आहे. म्हणजेच या कवितासंग्रहातील कवितांमध्ये समाजातील जिवंत स्थितीचा उल्लेख झालेला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्ष झाली. पण आजही सर्वसामान्य लोकांना न्याय मिळत नाही .आणि म्हणून ही समाजाची विस्कळीत घडी बदलविणे गरजेचे आहे. म्हणूनच कवी म्हणतात. "पुन्हा युद्ध झालेच पाहिजे" एक नवीन समाजाची घडी निर्माण करावी हाच संदेश या कवितासंग्रहाच्या माध्यमातून कवीला द्यायचा आहे असे दिसून येते.*

---

**विषय विवेचन :**

'वादळ वारं' हा आशिष घाटोळे यांचा पहिला काव्यसंग्रह आहे .जीवनातील मनुष्याच्या वाटेला येणारे वादळे, दुःख या कवितासंग्रहात जा विशिष्ट विषय आहे, असे दिसते. या संग्रहातील बहुतांश कविता या महाविद्यालयीन जीवनातल्या आहेत. तसेच कविता वाचतांना, कवितेमध्ये कवीने सामाजिक भान अधिक जोपासलेले आहे. समाजातील अवतीभवती दिसणारी गरीबी ,बेकारी ,विषमता ,वाढती लोकसंख्या, भ्रष्टाचार, भ्रष्ट न्यायव्यवस्था ,जातीयवाद, धर्मांधता, आतंकवाद अशा अनेक वाईट कृत्याने ग्रासलेला समाजाचे दर्शन कवीने या कवितासंग्रहात सादर केलेले दिसते.

समाजात दोन विभाग अधिक जास्त प्रमाणात दिसून येतो . तो म्हणजे गरीबी आणि श्रीमंती गरीबा जवळ घर नाही गरिबांची स्थिती " काय खावे "अशी झालेली आहे. तर ज्या व्यक्ती जवळ पैसा आहे तो म्हणतो "काय काय खाऊ" असे समाजातील गरिबी आणि श्रीमंती चे दोन विषमतेचे गट तयार झालेले आहे . हेच कवीने

आपल्या कवितेतून स्पष्ट केलेले आहे .

आपल्या देशात गरीब-श्रीमंत, उच्चवर्णीय ,नीचवर्णीय, भाषिक विषमता अधिक प्रमाणात दिसते . अधिक शिकलेली तरुण पिढी नोकरीशिवाय इतर व्यवसाय करायला तयार नाही. भारतातील वाढती लोकसंख्या बऱ्याच समस्येचे मूळ आहे, असे दिसते. तसेच सर्वात मोठी समस्या म्हणजे जातीयवाद व धर्मांधता या समस्या भारतामध्ये अधिक प्रमाणात दिसून येते . राजकारणी व धर्मांध नेते स्वतःच्या फायद्यासाठी व स्वतःचे पोट भरण्याकरिता अशा समस्या निर्माण करीत आहे.

भारतातील एक ज्वलंत व नवीन समस्या भ्रष्टाचाराची आहे. भ्रष्टाचार ही नवीन भारतीय संस्कृती झाली आहे. असे दिसते. तसेच आतंकवाद ही नवीन समस्या आहे. परंतु सत्ताधारी पक्ष याविरुद्ध कोणतेही ठोस पाऊल उचलत नाही. त्याच प्रमाणे भारतीय न्यायव्यवस्था हीसुद्धा काही प्रमाणात भ्रष्ट झालेली आहे. तसेच भारतीय लोकांना मिळणारा न्याय विलंबाने मिळत असल्याने गुन्हेगारी व भ्रष्ट प्रवृत्ती वाढत आहे. अशा अनेक विषमता निर्माण करणाऱ्या प्रवृत्ती समाजाला फार मोठ्या प्रमाणात कीड लावण्याचे कार्य करीत आहे. त्यामुळे आपल्या भारतीय समाजाला प्रगतीच्या दृष्टीने अडथळे निर्माण होत आहे. म्हणूनच कवी "युद्ध झालेच पाहिजे" या कवितेत म्हणतात.

युद्ध झालेच पाहिजे
दंगे झालेच पाहिजे
हक्कासाठी नव्हे तर
आपण आपल्या अस्मितेसाठी
नव्हे तर थोडेफार स्वार्थासाठी
लढलोच पाहिजे......

भारतामध्ये प्रत्येकाने आपापल्या अधिकारा करिता लढलेच पाहिजे. जसे अयोध्येत राममंदिर बनलेच पाहिजे .तसेच मशीद सुद्धा बनलीच पाहिजे. भावाभावा मध्ये युद्ध होणे महत्त्वाचे आहे . कारण हा भारत देश आपला आहे .येथली जमीन आपली आहे ,भारतातील हवा ,पाणी ,आकाश या सर्वांचा हक्क आपल्यावर आहे. त्यामुळे भारतीय माणसाने या सर्व गोष्टीवर अधिकार दाखविला पाहिजे. फक्त एवढी दक्षता घ्यावी की,

माणूस मारला नाही पाहिजे
कारण पर्यावरणाचा घटक आहे ....

असे कवी भारतीय मानवाला या कवितेतून सल्ला देण्याचे कार्य करीत आहे.

भारताची प्रगती ही काही अंशी इंग्रजांनी केलेली दिसते . असे कवीला "इंग्रजांनो" " तुम्ही आला नसता तर" या कवितेतून स्पष्ट करायचे आहे .

तुम्ही आला नसता तर

एका अमिबाचे झाले असते

असंख्य अमिबा
भूकलो असतो एकमेकांच्या दारावरून
जसा कोणी भुकतो झेलमच्या तीरावरून.

इंग्रज भारतात आले आणि भारतातील गरीब, शांत जनता, मुक जनता आपल्या हक्कासाठी बोलू लागली . भारतीय जनतेची वाढती विकृती तुम्ही आल्यामुळे संपुष्टात आली. या इंग्रजांनी भारतात येऊन जे नवे शोध निर्माण केले. व समाजाला प्रगतशील बनविले. हे फक्त शक्य झाले इंग्रजांच्या आगमनामुळे असे दिसून येते. म्हणून कवी म्हणतात ही भारतीय अराजकता संपविण्याकरिता,

तुम्ही पुन्हा या! अशी आर्त हाक येते .
जी कुंपणे काठीच्या आधारावर उभी केली
तीच शेते खात आहे असे दिसून येते.

मानवाला "पांघरून पाहून पाय पसरावे " ही म्हण जशी प्रसिद्ध झालेली आहे .तशीच प्रचिती कवीच्या "काजूची ढेकर" या कवितेत झाल्याशिवाय राहात नाही. मनुष्य बोलतांना अशक्य गोष्ट सुद्धा शक्य करून देण्याची हमी देऊ शकतो. परंतु आयुष्यात मिळाले तेवढ्या गोष्टीत समाधान मानणे फार महत्त्वाचे आहे. मनुष्याला नेहमी मिळालेल्या परिस्थितीशी सामना करून जीवन जगणे महत्त्वाचे असते .

उगाच शेंगदाणे खाऊन
काजूच्या ढेकरा देऊ नकोस!

आहे त्या परिस्थितीत समाधान मानून जीवन कंठणे योग्य आहे . असेच ही कविता वाचताना लक्षात येते. पुढील कवितेत शिक्षकांचा मोठेपणा सांगताना "शिक्षक" हा आधार वडा सारखा विद्यार्थ्यांच्या मागे उभा राहतो. हा वड एकाच ठिकाणी उभा राहतो.

पक्षी येतात
पक्षी जातात
किलबिल करतात
विसावा घेतात
पण वृक्ष
तसाच उभा राहतो

कारण वृक्षाच कामच असते, पक्षांना घडविणे, त्यांना विसावा देणे ,सावली देणे, आणि मायेचा हात त्यांच्या पाठीवर हात ठेवून संस्काराचे धडे देऊन मुलांचे संगोपन करणे. हा वादळ वाऱ्यातही हा शिक्षक ठाम उभा राहतो . कवी असे या कवितेतून स्पष्ट करतात.

भूत या कवितेत कवीने समाजातील वाईट प्रवृत्तीच्या मानवाला "भूत" म्हटलेले आहे. समाजात भ्रष्टाचाराला वाढविणाऱ्या या मानवी प्रवृत्ती भूतापेक्षा कमी नाही . म्हणूनच समाजातील हा भूत कवीला चिंचेच्या झाडाखाली न दिसता किंवा स्मशानात न दिसता तो भूत

तो भेटला ,
टेबलावर ,टेबलाच्या खाली
खुर्चीवर ,खुर्चीच्या खाली

असे समाजातील वाढती अराजकता या "भूत" कवितेतून कवीने साकार केलेली दिसते . समाजातील जे मुठभर चांगल्या प्रवृत्तीचे लोक आहेत . त्यांना कवीने "मित्र" म्हणून संबोधले आहे. हा मित्र वाईट प्रवृत्तीच्या लोकांना वाईट कृत्य करण्याकरिता थांबवित आहे. म्हणूनच कवी म्हणतात.

मुक्या चार डोळ्यांना चुकवत
लाल कुंकवाचा हुंदका आवरत
चिल्या पिल्ल्यांचे अश्रू गिळत
देत असतात तुम्ही पहारा
अन् थांबत असता भुताटकी

"वादळ वारा " या कवितासंग्रहातील प्रत्येक कविता मनाला चटका लावून जाणारी दिसते . कवितेचा प्रत्येक विषय हा वेगळ्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न कवीने केलेला दिसतो. "माणुसकीचे अर्थशास्त्र " या कवितेतून आज प्रत्येक व्यक्ती पैशाच्या मागे धावत आहे. त्या पैशामुळे तो माणसा- माणसातील माणुसकी पूर्णपणे विसरून गेलेला आहे . म्हणूनच कवी म्हणतात .

आज माणुसकी तेजीत आली
मागणी ज्यादा अन् पुरवठ्यात कमी झाली....

" शिवबा" या कवितेत कवीने छत्रपती शिवाजी महाराजांची थोरवी गायलेली आहे . छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेताच अंगात वीरश्री संचार करते . या शिवबा जवळ प्रेम ,निष्ठा ,आपुलकी ,भावनाशीलता, मर्दशाई "मूर्ती लहान पण कीर्ती महान" अशा शिवबाची आज फार गरज आहे. कारण राजकारणांची मोगलशाही या देशात अधिक माजली आहे. त्यावर निर्बंध शिवबास घालू शकतो, म्हणून कवी म्हणतात,

शिवबा तुझ्या येण्याची पाहतो सह्याद्री वाट
कधी उगवेल पुन्हा ती? हिंदवी स्वराज्याची पहाट?

अशी समाजातील वाईट प्रवृत्तीला तडा देण्याकरिता एका शिवबाची गरज समाजाला नक्कीच आहे ,असे कवि म्हणतात. जुनी नाते टिकवणे किती कठीण आहे ,पण जुन्याला काहीच मागणी नाही. कालांतराने जून नकोसे वाटते. मग ती जुनी नाती असो की जुन्या वस्तू असो, म्हणूनच "आंब्याचे झाड" या कवितेत आजोबांनी

लावलेल्या झाडाला कालांतराने महत्व कमी झालेले दिसते.

पण यंदा फर्निचरला
भाव चांगला आहे
म्हणून तुम्ही लावलेलं आंब्याचे झाड
आम्ही तोडत आहे!

"सूर्या " या कवितेत कवीने डॉ आंबेडकरांच्या विचारांना उजाळा दिलेला आहे. दलितां विषयी कळवळा निर्माण करणारे आंबेडकरांचा एकच नारा होता " शिका -संघटीत व्हा- संघर्ष करा" हे वाक्य दलितांना प्रेरणा देणारेच आहे असे दिसते. या दलितांना निळे आकाश देऊन , स्वच्छंदपणाने आकाशात भरारी मारण्याकरिता पंख सुद्धा या आंबेडकरी दूतानेच दिलेले आहे . असे कवि म्हणतात, समाजातील दुष्ट प्रवृत्तींना जवळ न घेता त्याला दूरच असू द्या असा मोलाचा संदेश "कबूतरे पोसू नका" या कवितेतून दिलेला आहे. 'पोट' या कवितेत कवी म्हणतात. वितभर असणाऱ्या पोटाची खळगी कोणीही भरू शकत नाही, मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा असो तो श्रीमंत असो, गरीब असो, पोट तर सगळयांनाच असते म्हणूनच कवी म्हणतात,

जगात ऐकले सगळ्यांचे तत्वज्ञान
हा ईश्वर हा अल्ला
पण राजे हो "पोट "
सर्वात मोठे होते

"कोंड " या कवितेतून समाजातील मानव आजूबाजूच्या वाईट प्रवृत्ती, भ्रष्टाचार यामुळे ग्रासलेला आहे . तो या घाणीतून बाहेर पडू शकत नाही. म्हणूनच या घाणीच्या कोड्यात सापडलेला मानव भ्रमिष्ट झालेला आहे.

आज प्रत्येक जीव काहीना काही मोबदला मिळावा या अपेक्षेनेच कार्य करीत असतो. प्रत्येकाला त्यातून आपला स्वार्थ प्राप्त करून घ्यायचा असतो. आजच्या युगात कुणीच कुणाची निस्वार्थ पणाने सेवा करू शकत नाही. म्हणूनच कवी जीवन एक व्यवहार आहे असे म्हणतो , जीवनात एकमेकांच्या आदान-प्रदाना शिवाय दुसरे शक्यच नाही म्हणूनच कवी म्हणतात,

बस्स! सत्य ते एकच
इथे कोणीच कोणाला
फुकट देत नव्हते
जो तो आपला आपला

मोबदला देत- घेत असतो. समाजातील आदर मान, सन्मान, प्रेम, आपुलकी , हे सर्वच नष्ट झालेले आहे. काल शिक्षकाविषयी जो शिष्यांचा आदर होता , गुरु- शिष्य परंपरा समाजात चांगली नांदत होती, त्या परंपरेला आज तडा गेलेला आहे . आजचा विद्यार्थी स्वतःला हुशार समजतो . विद्यार्थ्यांना गुरु विषयीची प्रेमभावनाच

राहिलेली नाही. म्हणून

काल एकलव्य होता
आज एकलव्य नाही आहे.

अशी भावना "एकलव्य नाही" या कवितेत कवीने साकार केलेली आहे.

"एकविसावे शतकाची " गोष्ट सांगताना कवी म्हणतात समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या डोळ्यात फसवेगिरीची भावना दिसू लागली . जो - तो आपल्या स्वार्थाची पोळी समाजामध्ये शेकू लागला. आपले कुणाला म्हणावे अशी वेळ आज आली म्हणूनच, कवी म्हणतात ,

जळताना सत्यवानाला पाहून
सती ही फितुर झाली .

अशी समाजातील लोकांची रीत झालेली आहे, असे दिसते. पण वास्तव ते वास्तव असते त्याला कुणीही बदलू शकत नाही जसे कृष्णासोबत मैत्री केल्याने सुदामाची भिक्षा मागणे बंद होत नाही, प्रत्येकाला जीवनातील चालणाऱ्या घडामोडीवर आपले कार्य करावेच लागते. त्याकरिता फुकटे कुणीही दुसऱ्याचे पोट भरीत नाही . हेच कवीने "वास्तव" या कवितेत स्पष्ट केलेलेआहे.

समाजातील बेकारी वाढत आहे. या बेकारीला कामाची वाट शोधणे तितकेच महत्त्वाचे झालेले आहे . म्हणूनच "पामर" या कवितेत कवी म्हणतात .

नको शब्द ,हवा हक्क
नवे गीत गाण्यासाठी
ही पामरे ना मरो
हक्काच्या त्या दाण्यासाठी

प्रत्येकाला हक्क मिळणे , आवश्यक आहे . आणि त्याकरिता मानवाने लढणे सुद्धा तेवढेच महत्त्वाचे आहे. असे दिसते.

"कसाई" या कवितेत कवी म्हणतात गरीबांना या समाजात कुठेच स्थान नाही. कारण तो गरीब आहे. या गरिबांचे पंख इथल्या बलाढ्य पैसा असणाऱ्या कसायांनी (वाईट मनुष्याने ) कापून टाकलेले आहे . आणि असे वाईट कृत्य करून स्वतःचे हात गंगेच्या पाण्यात धुतलेले आहे .म्हणजेच आपण निरपराधी आहोत असा भाव ते व्यक्त करीत आहे . या समाजात पैसे वाल्याची कदर आहे तोच या युगात जगू शकतो, असे दिसून येते .

आजची पिढी आजचे युग बदलत चालले आहे . नैतिक मूल्यांचा ऱ्हास होऊन वाईट चालीरिती समाजात तोंड वर काढीत आहे. समाजघटक कार्यशील झालेला आहे. म्हणूनच कवी म्हणतात.

घरोघरी पोहोचला इडियट बॉक्स
बाळया पाहे आई- बापासोबत दररोज नंगानाच

सगळीकडे अराजकता ,दुष्ट प्रवृत्ती, भ्रष्टाचार, अज्ञान या गोष्टीचे थैमान माजलेले आहे. म्हणूनच

पावसाच्या पहिल्या सरीचा येतो येथे दुर्गंध
शोधत आहे फुलपाखरू कोणत्या कळी पासून येते सुगंध

समाज पूर्ण वाईट प्रवृत्तीने भरलेला आहे. त्यामुळे चांगल्या गोष्टीचा अभाव जागोजागी कवीला दिसत आहे. जगातील चांगल्या गोष्टीचा शोध घेत घेत कवी सत्याची व्याख्या करतो.

सत्य हे सत्य असते
पचायला थोडं जड
गिळायला कडू असते.....
पण सत्य हे मेहनतीने भेटणारी
साडेतीन हात जमीन!

सत्य हे अजरामर आहे सत्य गगनाला आलिंगन घालण्याची क्षमता निर्माण करू शकतो . समाज हा चांगल्या गोष्टीच्या आधारावरच उभा आहे. सत्या कडून मनुष्य असेल तर तो ताठ मानेने समाजात उभा राहतो. त्याला कुणाचीही भीती वाटत नाही , बेधडकपणे तो कार्य करीत असतो .

मानवाच्या जीवनात कालचक्रा ला अधिक महत्त्व आहे , हे युग कुणासाठी थांबत नाही , आज मी जगाला प्रश्न विचारून वेडे करतो. तर उद्या मलाच प्रश्न विचारणारा काळ चक्राप्रमाणे निर्माण होऊन, माझ्यासमोर उभा राहील, हे जे संक्रमणाच्या चक्रावरच मनुष्याचे आयुष्य उभे आहे. हेच कवीने "कालचक्र" या कवितेत सांगितलेले आहे.

"चातक " या कवितेत कवीने आस्मानीतून येणारा पाऊस कसा फसवा आहे . याचे सुंदर वर्णन केलेले आहे. पहिल्या पावसाची वाट धरतीवरील पशु, पक्षी ,प्राणी, शेतकरी मोठ्या आतुरतेने पाहत असतात. पण हा पाऊस सर्वांसोबत फसवेगिरी करतो . आणि पृथ्वीतळातील लोकांची निराशा करतो. म्हणूनच कवी म्हणतात,

तो ही काया नभाकडे मोठ्या आशेने पाहायचा
जसा चातक काळे नभ पाहून गहिवरून जायचा
हा ही काळे नभ पाहून सरते तिफन काढायचा
पण तो नभ फसवा, न बरसतात जायचा.

समाजातील दांभिक साधू ,पोटभरू पंडित, कवीने आपल्या "अभंग " या कवितेतून ताशेरे उठविलेले आहे. कवी म्हणतात , जगाचा उद्धार करणारा विठ्ठल विटेवर उभा आहे . पण हे विठ्ठलाच्या अवतीभोवती फिरणारे पंडे जणूकाही गुंडे झालेले आहे . ते मंदिरातील दलाल झालेले आहे. म्हणून कवी म्हणतात,

ब्रम्हांड नायका
तुझे हे दलाल
करती हलाल
भोळ्या भक्ताला

अशी आजच्या पंडिताची वागणुकीची रीत झालेली आहे.

आजूबाजूची समाजातील जनता आपली स्वार्थी व मतलबी वृत्तीचा पदोपदी विचार करून जगत असतात. पण प्रत्येकच वेळी अशा स्वार्थी प्रवृत्तीच्या लोकांचा विजयच होतो असे नाही. म्हणूनच कवी म्हणतात

अंकल सॅम
कालच मी "मुंगीने हत्ती ची जिरवली"
ही गोष्ट ऐकली म्हणून सांगतो
तुमची टेटर गिरी थांबवा अंकल सॅम!

अशाप्रकारे स्वार्थीविषयी समाजातील उद्देशून कवीने ही कविता रचलेली आहे .

"आई" या कवितेत कवीने आईची महती विशद केलेली आहे . आई ही अथांग सागर आहे, घरातील तुळस आहे, मंदिराचा कळस आहे , तू आम्हा सारख्या चिल्या पिल्ल्या चा पळस आहे, तुझ्यासमोर कितीही संकटे आली तरी त्याला सामोरे जाण्याची ताकद तुझ्यात आहे. तू संस्काराचे बीज पेरणारी जननी आहे, कितीही संकटे आली तरी त्याला सामोरे जाण्याची शक्ती माझ्या माते मध्ये आहे . कवी म्हणतात , आई , तू ओंकार स्वरूपी आहे.

"सराईत गुंड " या कवितेत कवीने आई संबोधून समाजातील दुष्ट वागणुकीमुळे जो त्रास होत आहे ,आणि जे वाईट प्रवृत्तीचे लोक आहे ,ते समाजात दहशत पसरवून गुंड प्रवृत्तीने आपले कार्य करीत आहे . त्यांचेच आज समाजात उदो- उदो होत आहे . समाजात ताठ मानेने ते जगत आहे त्यांचेच नाव प्रसिद्धीच्या वाटेवर आहे . म्हणून कवी म्हणतात .

आई दानवाच्या भूमीवर
त्यांनाच आहे भाव
पेपरच्या फ्रंट पेजवर
त्यांचेच झळकते नाव

माणुसकीच समाजामध्ये राहिलेली नाही .जो तो आपली सत्ता गाजवायला लागलेला आहे . असे दिसून येते. प्रा. आशिष घाटोळे यांनी या कवितासंग्रहाचा शेवट आनंदाने हास्य फुवारे उडवून केलेला आहे. "हसा " या कवितेत कवी म्हणतात, कितीही दुःख वाट्याला आले तरीही ते दुःख घेऊन बसू नका. त्याकरिता गदगदून हसा, खळखळून हसा, जोपर्यंत जीवातजीव आहे . तोपर्यंत जीवनाचा हसून आनंद घ्या. आयुष्य दुःखाने भरलेले असले तरी त्यावर मात करण्याकरिता हसा म्हणून कवी म्हणतात.

" कधी नीलकंठा सारखे विष पिऊन हसा "

शेवटी हसण्यातच आनंद आहे. हसण्यातून दुःखाचा शेवट करा .आज दुःख आहे. पण उद्या या दुःखाचे परिवर्तन सुखात नक्कीच होईल . याची वाट पहा. निराश होऊ नका.

मित्रहो उद्या सूर्योदय होईल
हसा...... हाऽ हाऽ हाऽ हा ....

असा मोलाचा संदेश कवीने कवितासंग्रहाच्या शेवटी दिलेला आहे . मी सदैव ज्वालामुखी सारखा होईल, वादळ वाऱ्यासारखा वाहणार असून समाजाला आपल्या कवेत घेईल. अशी भूमिका कवीने स्पष्ट केलेली आहे.

"वादळ वार " या कवितासंग्रहात निराशा मानवाच्या वाट्याला आलेली आहे. पण ती निराशा अंगी न बाळगता संकटाला सामोरे जाऊन मार्गस्थ व्हा, असा संदेश कवीने दिलेला आहे . या संग्रहात प्रत्येक कविता नवीन विषय घेऊन आलेली दिसते. तसेच समाजातील जिवंत स्थितीचा उल्लेख कवितांमध्ये झालेला आहे. त्यामुळे प्रत्येक कविता ही बोलकी वाटते. देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्ष लोटली ,पण आजही सर्वसामान्य लोकांना न्याय मिळत नाही. विश्वामध्ये काही मुत्सद्दी व धर्मांध ताकत आपल्या फायद्यासाठी इतर मानवावर अत्याचार व हिंसाचार करीत आहे. त्यामुळे विनाकारण मानव व पर्यावरणातील सजीव निर्जीव घटक बळी पडत आहे .

त्यामुळेच ही समाजाची जी विस्कळीत घडी आहे. ती बदलविणे गरजेचे आहे. म्हणूनच जगातील अन्याय, अत्याचार ,दुःख ,दारिद्र्य ,दूर करून समाज दुष्ट प्रवृत्ती तून नष्ट होऊन, एक नवीन समाजाची घडी निर्माण करावी हाच कवीला या कवितासंग्रहाच्या द्वारे संदेश समाजाला द्यायचा आहे असे दिसते.

**निष्कर्ष :**

1. भारतामध्ये जातीयवाद व धर्माधता या समस्या अधिक दिसून येतात .
2. प्रत्येकव्यक्तीअधिकाराकरिता लढत आहे असे दिसते.
3. भारताची प्रगती ही काही अंशी इंग्रजांनी सुधारित केलेली दिसून येते .
4. मनुष्याला नेहमी मिळालेल्या परिस्थितीशी सामना करून जीवन जगणे महत्त्वाचे असते.
5. नवीन समाजाची घडी निर्माण करावी हाच संदेश या कवितासंग्रहातून दिलेला आहे असे दिसते.
6. संकटाला सामोरे जाऊन मार्गस्थ होणे.असा या कवितासंग्रहातील कवीचा हेतू आहे.

**संदर्भसूची :**

• "वादळ वारा" - प्रा. आशिष घाटोळे, आर. के. प्रकाशन, काटोल -२०१५